M.S.P. Mandal's

# Shri Shivaji Polytechnic Institute,

## Shri Shivaji College Campus, Basmat Road, Parbhani.

## Tentative Fees Structure -2023-24

| DISCRIPTION | TUITION FEES | DEVELOPMENT FEES | TOTAL FEES |
|---|---|---|---|
| DIPLOMA COURSE | 34483/- | 3517/- | 38000/- |

Dr. Shahid Thekiya
Principal
Shri Shivaji Polytechnic Institute,
Vasmat Road, Parbhani-431401 (M.S.)

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
४ था मजला,मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु
चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३५३५ Email ID : tashi५-hted@mah.gov.in

क्रमांक :- E No.643897-HTED/(TE-5) दिनांक -: २७ जुलै, २०२३

प्रति,

संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
३,महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१.

**विषय:**-राज्यातील विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याव्दारे चालविण्यात येणाऱ्या तंत्र शिक्षण संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार फी घेण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ:**-संचालक,तंत्रशिक्षण संचलनालय यांचे पत्र क्र.१०/ एनजीपी/ फी.नि.स. शुल्क/२०२३ /५४८ , दि.०४.०७.२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधिन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शुल्क आकारण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. यानुषंगाने पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थांना २०२३-२४ वर्षाकरीता शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आकारण्यात आलेले शुल्क अंतरिम शुल्क म्हणून घेण्याची परवानगी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

१. सदर परवानगी अंतरिम शुल्क हे शुल्क निश्चिती समितीच्या अंतिम शुल्काच्या मान्यतेच्या अधीन राहून असेल.
२. शुल्क निश्चिती समितीने प्रत्यक्षात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संबंधित संस्थांना शुल्क निश्चित करुन दिल्यानंतर, सदर शुल्क संस्थांकडून घेण्यात आलेल्या अंतरिम शुल्कापेक्षा जास्त असल्यास, सदर जास्तीचे शुल्क संबंधित संस्थांना विद्यार्थ्यांकडून घेता येईल.
३. शुल्क निश्चिती समितीने प्रत्यक्षात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संबंधित संस्थांना शुल्क निश्चित करुन दिल्यानंतर, सदर शुल्क संस्थांकडून घेण्यात आलेल्या अंतरिम शुल्कापेक्षा कमी असल्यास, विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेले जास्तीचे शुल्क संबंधित विद्यार्थ्यांना संस्थेला परत करावे लागेल.
४. सदर बाब प्रवेशाच्या वेळी संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे संस्थांना बंधनकारक आहे.

तरी उपरोक्त मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण संचलनालय यांनी परिपत्रकाद्वारे संबंधितांना कळविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

(अनिता तुम्मुलवार)

**कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा , मुंबई ४०००५१.

Ref No. ②

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/पदविका अंतरिम शुल्क/२०२३/ ६२३ दिनांक : 2 8 JUL 2023

विषय: राज्यातील विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याव्दारे चालविण्यात येणाऱ्या तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार फी घेण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ: उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन पत्र क्रमांक: E.No. ६४३८९७-HTED/(TE-५), दिनांक : २७.७.२०२३.

राज्यातील विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याव्दारे चालविण्यात येणाऱ्या तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार फी घेण्यास परवानगी देण्यासंबधीचे संदर्भाधीन शासन पत्र या संचालनालयास प्राप्त झालेले आहे. शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

तरी, सदर शासन पत्रात नमूद अटी व शर्तींस अनुसरुन पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व संबंधीत संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता शुल्क आकारणीबाबत कार्यवाही करावी.

(डॉ. गोविंद संगवई)
प्र.उपसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत: माहिती व कार्यवाहीसाठी.

१. मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे, त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अखत्यारीतील सर्व संबंधीत पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
२. मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
३. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या सर्व संकेतस्थळावर तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

Ref. No. ③

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने, औषधनिर्माणशास्त्र संस्था व शासनमान्य अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थामधील अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी गठीत केलेल्या फि निश्चिती समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
आदेश क्र. संकिर्ण-२०२३/(प्र.क्र.६४/२३)/तांशि-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १३ सप्टेंबर, २०२३.

वाचा :-

१) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२३.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, अधिसूचना क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२५२/तांशि-४, दिनांक ५ जुलै, २०१८.
३) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/एमएसबीटीई /फीनिसप्र/२०२३/३६५, दि. १७ मे, २०२३.
४) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२३/(प्र.क्र. ६४/२३)/तांशि-५, दि. ०८ जून, २०२३

प्रस्तावना :-

राज्यातील विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याद्वारे चालविण्यात येणाऱ्या तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची फी निश्चिती करण्याबाबत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम २०२३ दि.२६.०४.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. त्याअधिनियमातील कलम २४ अ "(१) येथे शासनास विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतन किंवा मंडळाशी संलग्न संस्था याद्वारे चालविण्यात येणाऱ्या प्रत्येक पदविका स्तरीय तंत्र शिक्षण देण्याचा प्रत्यक्ष खर्च ठरविण्यासाठी फी निश्चिती समिती व समितीचा अध्यक्ष व सदस्य यांच्या वित्तलब्धी व इतर देय भत्ते, पदावधी व सेवेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे. तसेच कलम २४ "(२) येथे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यांच्या कलम १३, १४ व १५ मध्ये तरतूद केलेली शुल्क नियामक प्राधिकरणाची कार्ये, अधिकार व कार्यपध्दती, शुल्क नियामक प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपध्दती आणि शुल्क संरचनेचे निर्धारण करण्यासाठी घटक, पोट कलम (१) अन्वये घटित केलेल्या फी निश्चित समितीद्वारे असे प्रत्येक शिक्षण देण्याचा वास्तविक खर्च ठरविताना, योग्य त्या फेरफारांसह अनुसरण्यात येतील" अशी तरतूद केलेली आहे.

२. उक्त तरतूदींच्या अनुषंगाने फी निश्चिती समिती संदर्भाधीन क्र.(४) येथील दि.०८/०६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार शुल्क निर्धारण समितीची रचना, अध्यक्ष व सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवाशर्ती, समितीची कार्ये, अधिकार व कार्यपध्दती, प्रक्रिया शुल्क, समितीच्या कार्यालयासाठी लागणारी जागा, समिती अध्यक्षांचे वेतन व भत्ते ई.बाबी ठरविण्यात आल्या आहेत.

३. उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन फी निश्चिती समितीच्या अध्यक्षांची निवड करण्याकरीता प्राप्त झालेल्या आवेदनपत्रांची छाननी करून शासनास शिफारस करण्याकरिता मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील दि.०२/०८/२०२३ रोजी निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने उक्त समितीच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

आदेश :-

राज्यातील महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नीत विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने, औषधनिर्माणशास्त्र संस्था व शासनमान्य अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्था यामधील अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी गठीत केलेल्या फी निश्चिती समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम २०२३ च्या कलम २४(अ) अन्वये प्राप्त झालेल्या शक्तीचा वापर करून खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात येत आहे. सदर अभ्यासकमांचे शिक्षण शुल्क यापुढे या समितीमार्फत निश्चित करण्यात येईल.

| अ.क्र. | प्रवर्ग | निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचे नाव |
|---|---|---|
| १ | **फी निश्चिती समितीवरिल अध्यक्ष पदाकरीता उमेदवार –**<br>क) प्रधान सचिव दर्जापेक्षा कमी नसलेल्या दर्जाचा सेवानिवृत्त अधिकारी | श्री.समीर कुमार बिश्वास |
| २ | **फी निश्चिती समितीवरिल सदस्य पदाकरीता उमेदवार –**<br>ख) तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक म्हणून काम केलेले सेवानिवृत्त अधिकारी | डॉ.सुभाष के. महाजन |
| | ग) दहा वर्षाहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेचा सदस्य असेल असा नामांकित सनदी लेखापाल | श्री.तेजस व्ही. पाध्ये |
| | घ) दहा वर्षाहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय व्यय आणि परिव्यय लेखा संस्थेचा सदस्य असलेला असा नामांकित परिव्यय लेखापाल किंवा प्रख्यात अर्थतज्ञ | श्री.हर्षद एस. देशपांडे |
| | ङ) तंत्रशिक्षण क्षेत्रातील अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र यामधील प्रत्येकी एक नामांकीत तज्ञ (२ सदस्य) | १) डॉ.यशवंत व्ही. जोशी<br>२) डॉ.विष्णुकांत शिवप्रसाद मौर्य |

२. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०९१३१६४७४८९८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATISH JAGDERAO TIDKE

Digitally signed by SATISH JAGDERAO TIDKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SATISH JAGDERAO TIDKE
Date: 2023.09.13 16:51:43 +05'30'

**( सतीश तिडके )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत :-

१. मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
२. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक,
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक,
५. प्रधान सचिव नि विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक,
६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,

७. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
९. श्री.समीर कुमार बिश्वास,१००४/४७,सीवुड इस्टेट को.ऑ.हौ.सो.,एन.आर.आय.कॉम्प्लेक्स, नेरुळ, नवी मुंबई -४०० ७०६.
१०. डॉ.सुभाष के.महाजन, २०१, प्राईड पॅराडाईज, मॉडेल कॉलनी-१०४१, शिवाजी नगर पुणे-१६.
११. श्री.तेजस व्ही. पाध्ये, मुंबई
१२. श्री.हर्षद एस.देशपांडे, ४०३, कुमार मिलीनियम, शिवतिर्थ नगर कोथरूड, पुणे-४११०३८.
१३. डॉ.यशवंत व्ही जोशी, प्लॉट नं.७१, सुमतीपुर्ण रोड, छत्रपती नगर, नांदेड-४३१६०५.
१४. डॉ.विष्णुकांत शिवप्रसाद मौर्य, सी-१०१,रांगा आल्टीस, फेज २, नाथ सीड्स जवळ, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००५.
१५. निवड नस्ती/तांशि-५.